क्र.का.4/प्र.क्र.172/07/813
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे1
दिनांक: 06/06/2007

**विषय -** बोगस व्यक्तींव्दारे मिळकत विक्रीस प्रतिबंध घालण्यासंदर्भात.

## <u>परिपत्रक</u> :-

**पार्श्वभूमी-**

नोंदणीसाठी दाखल करण्यात आलेल्या दस्तऐवजाचे निष्पादन केल्याबाबत कबुलीजबाब देणा-या पक्षकाराच्या अभिन्नतेविषयी (ओळखीविषयी) दुय्यम निबंधक नोंदणी नियम 1961 चे नियम 48 मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार खातरजमा करतात. याबाबत पुरक सुचना नोंदणी आदेशसहित क्र.243 अन्वये देण्यात आलेल्या आहेत. विशेषत: पुणे जिल्हयातील वडगाव मावळ व मुळशी तालुक्यात काही मिळकतींची विक्री बोगस व्यक्तींव्दारे करण्यात आल्याबाबत तक्रारी उपस्थित झाल्या आहेत आणि त्याबाबत पोलीस विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू आहेत. अशा प्रकारांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने महसूल व पोलीस विभागातील अधिका-यांबरोबर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेवरुन, निष्पादकाची ओळख पटविणा-या व्यक्तींची अधिक काटेकोरपणे तपासणी झाल्यास प्रकरणांचा तपास करण्यात मदत होवू शकते असे दिसून आले आहे.

यास्तव नोंदणी आदेश संहिता क्र.243 मधील सुचनांचे अनुषंगाने राज्यातील सर्व दुय्यम निंबधकांना पुनरपी पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

1. ओळख देणा-या व्यक्ती संबंधित पक्षकारांस खरोखरीच ओळखत आहेत का असे ओळख देणा-या व्यक्तीस विचारावे व त्यांनी स्पष्ट शब्दात होकार दिल्यास ओळख ग्राहय धरावी.
2. ओळख देणा-या व्यक्तीचे वय, व्यवसाय व पुर्ण पत्ता विचारुन घेवून दस्तऐवजावरील शे-यामध्ये नमुद करावा. दस्त निष्पादक व्यक्ती सामान्यत: त्या कार्यक्षेत्रात राहणारी नसेल तर त्यांची ओळख पटविणा-या व्यक्तींच्या बाबतीत विशेषत्वाने खातरजमा करावी.
3. आदेश संहिता क्र 243 स्पष्ट नमूद केल्याप्रमाणे दस्त लेखनीक, मुद्रांक विक्रेता व वारंवार ओळख पटविणा-या व्यक्तींच्या ओळखी ग्राहय धरु नयेत. असेही निर्देशनास आले आहे.की काही व्यक्ती ओळख पटविण्याचा व्यवसाय करतात. त्या व्यक्तीच्या ओळखी ग्राहय धरु नयेत. मिळकत व्यवहारातील वाढते गैरप्रकार विचारात घेवून विशेषत: पुणे जिल्हयातील वडगाव मावळ मुळशी व खेड या तालुक्यातील प्रकरणांच्या अनुषंगाने पोलिस अधिका-यांनी दिलेली सुचना विचारात घेवून या तालुक्यातील दुय्यम निबंधकांना जनहितास्तव पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

1. <u>खालीलपैकी कोणताही एक पुरावा सादर करणा-या व्यक्तीचीच ओळख ग्राहय धरावी.</u>

अ) पासपोर्ट

ब) वाहन चालविण्याचा परवाना.

क) आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र

ड) केंद्र शासन/ राज्य शासन /सार्वजनिक उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी कंपन्या अथवा

कारखाने यांनी आपल्या कर्मचा-यांना दिलेली ओळखपत्रे

इ) ज्यावर छायाचित्र आहे असे बॅकेचे/किसान/पोस्टाचे पासबुक

ई) स्वातंत्र्यसैनिकाचे ओळखपत्र

फ) छायाचित्र असलेला अपंगत्वाचा दाखला

भ) निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र

म) बार कौन्सिल यांनी वकिलांना दिलेले ओळखपत्र

मुळ पुरावा तपासून त्याची झेरॉक्स प्रत दस्ताचा भाग म्हणून लावून घ्यावी.

2) <u>ओळख देणा-या व्यक्तीच्या सहीबरोबरच अंगठयांचा ठसादेखील उमटवून घ्यावा व पासपोर्ट आकाराचा फोटो त्या शेजारी लावून घ्यावा.</u>

सर्व संबंधित दुय्यम निबंधकांना कळविण्यात येते की, मिळकत हस्तांतरण व्यवहारातील गैरप्रकारांना पायबंद घालण्याच्या हेतूने सदर सुचना देण्यात येत आहेत. तरी सर्व दुय्यम निंबधकांनी याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील सुचनांची योग्य रितीने अंमलबजावणी होत आहे याबाबत सह जिल्हा निबंधक यांनी दुय्यम निंबधक कार्यालयांच्या तपासणीच्या वेळी विशेषत्वाने खातरजमा करावी.

सही/-रामराव शिनगारे

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**

**महाराष्ट्र राज्य,पुणे**

**प्रति:-**

1) सर्व दुय्यम निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षकांमार्फत).

2) सर्व सह जिल्हा निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षकांमार्फत).

**प्रत-**

1) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक

2/- प्रस्तुत परिपत्रकाची प्रत आपल्या प्रादेशिक विभागातील दुय्यम निबंधक व सह जिल्हा निंबधकांना तात्काळ अग्रेषित करावी.

2) सर्व कार्यासन अधिकारी नोंदणी महानिरीक्षक कार्यालय पुणे.